| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १०५ वा | मंगळवार, दिनांक १४ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्ष-पदाला पक्षातूनच थेट आव्हान!

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (NCP) राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली. मात्र, आता त्यांच्या या निवडीला थेट पक्षातूनच आव्हान देण्यात आले आहे. पक्षाचे माजी राष्ट्रीय सचिव आणि ज्येष्ठ नेते सच्चिदानंद सिंह यांनी वकिलांमार्फत नोटीस पाठवून सुनेत्रा पवारांच्या निवडीवर आक्षेप नोंदवला असून राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा घेण्याची मागणी केली आहे. या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रफुल्ल पटेल-सुनील तटकरे विरुद्ध सुनेत्रा पवार-पार्थ पवार असा अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.




**सच्चिदानंद सिंह यांचे मुख्य आक्षेप काय आहेत?**

सच्चिदानंद सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या निवडीबाबत काही तांत्रिक आणि घटनात्मक मुद्दे उपस्थित केले आहेत:

प्रफुल्ल पटेलांचे अधिकार डावलले: २८ जानेवारीला अजित पवार यांच्या निधनानंतर, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक आयोगाला देण्यात आलेल्या सुधारित घटनेनुसार, नवीन अध्यक्ष निवडेपर्यंत राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्याकडे अध्यक्षांचे सर्वाधिकार होते.

बैठकीची कायदेशीरता: कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना सर्वाधिकार असताना, पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी कोणत्या अधिकारात २६ फेब्रुवारीला राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावली?

परवानगीचा अभाव: २६ फेब्रुवारीला बैठक बोलावण्यासाठी १८ फेब्रुवारीला जे पत्र निवडणूक आयोगाला दिले, त्यावर तत्कालीन राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्यांची संमती घेण्यात आली नव्हती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून झालेली निवड बेकायदेशीर असल्याचा दावा सिंह यांनी केला आहे.

**नोटीस प्रकरणावर प्रफुल्ल पटेल काय म्हणाले?**

या वाढत्या वादावर राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, सुनेत्रा पवार यांना पाठवलेल्या नोटीसशी माझा कुठलाही संबंध नाही. त्या नोटीसला फार महत्त्व देण्याचे कारण नाही. सुनेत्रा पवार यांची निवड पक्षाच्या घटनेला धरूनच झाली आहे, असे पटेल यांनी स्पष्ट केले. मात्र, पक्षातील सद्य:स्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढणे गरजेचे आहे. त्यासाठी पक्षात काही सुधारणा आवश्यक आहेत, हे माझे वैयक्तिक मत आहे.

**षडयंत्रामागे मास्टरमाइंड कोण? जय पवारांच्या भूमिकेकडे लक्ष**

सच्चिदानंद सिंह हे गेल्या १५ वर्षांपासून पक्षाशी जोडलेले आहेत आणि अजित पवार अध्यक्ष असताना त्यांची डिसेंबर २०२३ मध्ये राष्ट्रीय सचिव म्हणून नियुक्ती झाली होती. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या निवडीवेळी (२६ फेब्रुवारी २०२६) जाहीर झालेल्या कार्यकारिणीत त्यांना वगळण्यात आले.

सिंह यांनी ही नोटीस स्वतः हून पाठवली की यामागे पक्षातीलच एखाद्या 'मास्टरमाइंड' बड्या नेत्याचे डोके आहे, याचा शोध आता वरिष्ठ पातळीवरून घेतला जात आहे. यावर आता पक्षाच्या शिस्तपालन समितीचे अध्यक्ष जय पवार काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**कलहाची पार्श्वभूमी: पटेल-तटकरे विरुद्ध पवार कुटुंबीय?**

काही महिन्यांपूर्वी, निवडणूक आयोगाशी झालेल्या पत्रव्यवहारात सुनेत्रा पवार यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची पदे केवळ 'गटनेते' (अनुक्रमे राज्यसभा आणि लोकसभा) अशी नमूद करून त्यांच्या आधीच्या अधिकृत पदांचा उल्लेख टाळला होता. हा संभ्रम चार महिने उलटूनही दूर झालेला नाही. पक्षाच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये वाढते केंद्रीकरण आणि पवार कुटुंबातील निष्ठावंतांना दिले जाणारे झुकते माप, यामुळे काही वरिष्ठ नेते नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आगामी काळात पक्षातील ही पोकळी आणि अंतर्गत कलह शांत करून सामूहिक नेतृत्व निर्माण करण्यात राष्ट्रवादीला यश येते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आषाढी वारीनिमित्त आयोजित 'चरण सेवा' उपक्रमात लातूर येथे २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

### *मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचा उपक्रम*

लातूर/प्रतिनिधी: मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय आणि लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त 'चरण सेवा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १२ आणि १३ जुलै २०२६ रोजी लातूर येथील श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर मंदिर येथे झालेल्या या उपक्रमात २५० पेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी व मोफत उपचार करण्यात आले.



नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सद्गुरु श्री गुंडा महाराज संस्थानच्या दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे. या दिंडीसोबत शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात. वारकऱ्यांच्या या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या नेतृत्वामध्ये राज्यभर 'चरण सेवा' उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात सुमारे ६० वैद्यकीय व निमवैद्यकीय तज्ज्ञांच्या चमूने २५० हून अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, चरण सेवा व औषधोपचार उपलब्ध करून दिले. वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयातर्फे वारकऱ्यांना आयुष उपचार पद्धतीद्वारे आवश्यकतेनुसार उपचार करण्यात आले. तसेच लातूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वैद्यकीय चमुमार्फत रुग्णांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधी देण्यात आली. या प्रसंगी संस्कार भारतीच्या चमूकडून काढण्यात आलेली आकर्षक रांगोळी आणि फुलांची सजावट सर्वांचे मुख्य आकर्षण ठरली होती.

## खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव बंडप्पा काळगे यांनी शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी उशिरा रात्री लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची लातूर येथील शासकीय विश्राम गृहात भेट घेऊन लातूर जिल्ह्याशी निगडित तीन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित विषयांबाबत स्वतंत्र निवेदने पालकमंत्र्यांना सादर केली.

खा. डॉ. काळगे यांनी लातूर शहरातील वाढती वीज मागणी लक्षात घेता शहरात नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची योग्य जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नवीन उपकेंद्र उभारल्यास लातूर शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच, चालू खरीप हंगामात लातूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी वापरलेल्या बियाण्यांची उगवण अत्यल्प झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्याने निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली.

### प्रभात किरणे

असता धन,वापरावे जपून
नसता धन,नसे आपले कोण
वाटते माझे माझे अनेकजन
धनाला धनवान असे धर्जिन
- इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## दिव्यांग बांधवांच्या अडचणी प्राधान्याने सोडवा: जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या विविध समस्या व अडचणींचे प्राधान्याने निवारण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व शासकीय यंत्रणांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीस जिल्ह्यातील विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी आणि संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते राजू गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक बसवराज पैके, विशेष शिक्षक व्यंकट लामजने यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार आता प्रत्येक सोमवारी ग्राम आणि तालुका पातळीवर दिव्यांगांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. तसेच जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि 'अलिमको' मार्फत दिव्यांग बांधवांचे मोजमाप घेऊन त्यांना आवश्यक कृत्रिम अवयव पुरविले जातील. या प्रक्रियेला गती देण्यासाठी 'यु.डी.आय.डी.' संगणक ऑपरेटर यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, सत्यापन प नोंदणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत सर्व ग्रामसेवकांना आवश्यक निर्देश दिले जाणार आहेत.

यासोबतच जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांचे आधार कार्ड अपडेट करण्याचे काम वेगाने पूर्ण केले जाईल आणि त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्राधान्याने मिळवून दिला जाईल. तसेच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत पात्र दिव्यांग बांधवांचा 'अंत्योदय अन्न योजनेत' समावेश करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी लातूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांची अचूक नोंदणी करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असणाऱ्या साहित्याची मागणी नोंदवण्यासाठी 'गुगल फॉर्म' वर नोंदणी करण्याचे निर्देश दिले, तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत दिव्यांगांना वाहतूक परवाना मिळण्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करून परवाना देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महागाईचा दर सलग ६ व्या महिन्यात वाढला...

### चिमटा दयाचा

लातूर शहरात अनेक शासकिय कार्यालयात दिव्यांगाच्या समस्याचा डोंगर आहे !
अनेक दिव्यांगाना कार्यालयात जाण्यास अग्निदिव्य आहे !!
तरी दिव्यांगाबाबत भरपूर काही करण्याची गरज आहे !!

## कुलकर्णी परिवाराच्या विवाह सोहळ्यास मान्यवरांची मोठी उपस्थिती

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील पत्रकार हरीराम कुलकर्णी यांची कन्या दिशा व कुमठा तालुका अहमदपूर येथील बाळासाहेब कुमठेकर कुलकर्णी यांचे चिरंजीव प्रशांत यांचा शुभ विवाह सोहळा लातूर येथील कस्तुराई मंगल कार्यालयात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला नव वधू - वर यांना उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देवून आशीर्वाद दिले.



यावेळी राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख, नांदेड पोलीस परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे ,पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर चे सहअध्यक्ष सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, अशोकराव पाटील निलंगेकर, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष एडवोकेट प्रमोद जाधव मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळेरेणाचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील ,रेना साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख ,लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ट्वेन्टी वन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, रेणाचे उपाध्यक्ष प्रवीण पाटील, मारुती साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी जिल्हाधिकारी कृष्णा लव्हेकर उत्तरादी मठाचे प्रमुख पंडित रघुत्तम जोशी,एकमतचे संपादक मंगेश देशपांडे डोंगरजकर, निवासी संपादक वसिष्ठ घोडके, ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे जयप्रकाश दगडे, हरिभाऊ तुगावकर राम जेवरे, अभय मिरजकर, सुशांत सांगवे, गौतम कांबळे,महेंद्र जोंधळे,राजकुमार सोनी संजीव पाटील, हणमंत गायकवाड सूर्यप्रकाश धुत श्री जडे, विष्णू शिंदे, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर मनपा नगरसेवक प्रवीण कस्तुरे, गिरीश पाटील, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, सेवानिवृत्त तहसीलदार कृष्णा चार्य शिवणे,पंडित अनंताचार्य काशीकर, निवृत जिल्हाधिकारी बाळासाहेब जहागीरदार, (सोलापूर) माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कुलकर्णी, उदयसिंह देशमुख नारायण लोखंडे,अँड कालिदास देशपांडे, पंडित मही दासाचार्य धर्माधिकारी (नांदेड) पंडित रामाचार्य हलगरकर ,पंडित उद्धव जोशी,नागेश आपटे(पुणे) ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष दिवाकर कुलकर्णी धनेगावकर, संतोष देशमुख, डॉक्टर कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, नर्सिंग दिवाणजी, प्रा जयंत शास्त्री, डॉ अजित कुलकर्णी, नारायण देसाई , विजयकुमार पटवारी ,यांच्या सह लोकप्रतिनिधी विविध संस्थांचे पदाधिकारी अधिकारी,जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव स्नेही मित्र नातेवाईक कुमठा व जवळगा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी यजमान पत्रकार हरीराम कुलकर्णी व बाळासाहेब कुमठेकर यांनी परिवाराच्या उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील,माजी मंत्री आमदार अमीतजी देशमुख यांनी नव वधू- वर यांना विवाह नीमित्त शुभेच्छा संदेश वाचून दाखवला.

## धारदार तलवारीसह एकास केले जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत उदगीर शहर पोलिसांनी कारवाई करत एका इसमास धारदार लोखंडी तलवारीसह ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास संग्राम शाळा मैदान, फुलेनगर, उदगीर परिसरात राजन (वय ३५ वर्षे, रा. गांधीनगर, उदगीर) हा स्वतःच्या ताब्यात बेकायदेशीररित्या धारदार लोखंडी तलवार बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करून आरोपीस ताब्यात घेतले.



त्याच्याकडून सुमारे ३३ इंच लांबीची, २६ इंच पाते व ७ इंच मुठ असलेली, अंदाजे १,००० किमतीची लोखंडी धारदार तलवार जप्त करण्यात आली. सदर इसम हातात धारदार शस्त्र घेऊन दहशत निर्माण करीत असल्याचे प्राथमिक तपासात बाळगल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी उदगीर शहर पोलीस ठाणे गुरनं. २८८/२०२६ अन्वये कलम ४/२५, शस्त्र अधिनियम, १९५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी उदगीर श्री गजानन भातलवंडे चे मार्गदर्शनात पोलीस ठाणे उदगीर शहर चे पोलीस निरीक्षक वीरप्पा भुसनूर यांच्या नेतृत्वातील पथकाकडून करण्यात आली असून या प्रकरणातील फिर्यादी पोलीस अंमलदार सतीष भानुदास पवार आहेत. गुन्हा पोलीस अमलदार सगर यांनी नोंदविला असून पुढील तपास पोलीस अमलदार उस्तुर्गे करीत आहेत.

लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहतील.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नियोजन व शिस्तीचा अभाव...

देशात नियोजन व शिस्तीचा अभाव असल्याने समस्या कायम दिसून येत आहेत. कठोर निर्णयाची गरज असताना मवाळ धोरणाने सर्वच बिघडले आहे. कोणीही समाधानी नाही. कोणीही संतुष्ठ नाही. त्यामुळे सर्वच तणावात दिसून येत आहेत. शेतकरी, सरकारी कर्मचारी आदि असमाधानी असतील तरच यशस्वीता मिळते. मुळात सरकार अनेक योजना तयार करते. योजना ही एक दिवसात तयार होत नाही तर अनेक दिवस यावर चर्चा व बैठका होतात, परिश्रम घ्यावे लागतात. त्यामुळे विचारविनिमय होवून सरकार निर्णय घेत असते. तरी काही त्रुट्या राहातात. त्रटी व चुका यात फरक आहे. त्यापेक्षाही योजना राबविणे कठिण आहे. शेतकऱ्यासाठी अनेक योजना आहेत. त्या मुळात माहितीच नसल्याने कळून येत नाही. राज्यात जो विभाग असतो त्याचे कार्यालय तालुकास्तरावर असते. सरकार जनतेसाठी मोठा खर्च करते. योजना यशस्वी होत नाहीत. त्यामुळे कोणीही समाधानी नाही. योजना ही सरळ व सोपी असली पाहिजे.बऱ्याच योजना जगू ही देत नाहीत व मरूही देत नाहीत. अतिषय तुटंपुंजी मदत मिळते तसे पाहिले तर दिड हजार महिलांना रक्कम दिली जाते. दररोज पन्नास रुपये! ह्या पन्नास रुपयात घर भागते का? केवळ विचार करा. दिड हजारासाठी रांगा दिसून येतात. तहसील म्हणून काही योजना मंजूर होवून महिण्याला ठराविक रक्कम मिळते. ती आता बँकेतून मिळते. निराधार, विधवा महिला, वयोवृद्धांना मदत दिली जाते. ही मदत महिणा भागवू शकते का? विचार करा. पांच हजाराच्या आत मदत मिळत असेल तर त्यात घर भागते का? आजारपन, औषधोपचार आदि भागते का? केवळ विचार करा, कारण देशातील जनता भरभटत जात आहे. ज्या योजनामुळे भागत नसेल, घर चालविण्याएवढी मदत मिळत नसेल तर मागता कशाला? इतर देशात अशा योजना दिसून येत नाहीत. इतर काही देशाचा अभ्यास केला तर आरोग्य व शिक्षण मोफत आहे. अधिक पैसा कमावुन ठेवण्याची गरज नाही. भ्रष्टाचार कशामुळे वाढला, तो संपत का नाही याचा समुळ विचार केला जात नाही. मुळात पैसा लागताचे कशाला याचा विचार थंड डोक्यांनी प्रथम केला पाहिजे. आज आर्थिक हाव, लालच प्रत्येकात दिसून येते. यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. आज स्वस्त धान्य दुकानातून मिळालेले तांदुळ व गव्हु बाजारात विकले जातात हे दुःखाने नमुद करावे वाटते. ही वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. जनतेला अनुदान, पगारी त्याही तुटपुंजी मदत देता कशाला व घेता कशाला हेच कळून येत नाही. देशात एवढी महागाई वाढली आहे की, क्षणात शंभराची नोट पार होते. भाजीपाला खरेदी करावयाची म्हटले तर शंभराची नोट पुरत नाही. मग दिड हजारात काय भागते, जे तहसील मधुन अनुदान मिळते यात तरी भागते का? आपण विचार करीत नाहीत. आज ही हाव दिसून येत आहे ती केवळ देखावा आहे. पैशाच्या बदल्यात सर्व काही मोफत द्या, शिक्षण, आरोग्य सुविधा, घरटॅक्स आदि मोफत करा. कर विकासासाठी घ्या. जे श्रीमंत आहेत. आजही न मागता टॅक्स भरणारी मंडळी आहे. त्याच्याकडून प्रामाणिक कर घ्या. मात्र नको त्या बाबीला कर लावला जात आहे. रस्ते चांगले बांधले रोडटॅक्स, त्याला टोल टॅक्स म्हटले जाते. रस्ते, वीज, पाणी ज्या मुलभूत सुविधा आहेत, त्यातर विनामुल्य दिल्या पाहिजेत. कशासाठी कर वसुल करता? ज्या बाबी सरकारने जनतेला दिल्या पाहिजेत. देणे कर्तव्य आहे अशांना कर! समसमान शिक्षण करा. काही मोठ्यांनी लेकरे इंग्लीश शाळेत मोठ्या उंच प्रतीच्या शाळेत, बाकीचे जिप व नगरपरिषदेच्याशाळेत! यात देणारे शिक्षण भिन्न आहे का? मोठ्याची व गरीबांचे लेकरे असा भेदभाव कशासाठी केला जातो हेच कळून येत नाही. समसमान शिक्षण द्या. आरोग्य खाजगीसेवा बंद करा. सरकारी रुग्णायातून आरोग्य सुविधा पुरवा. तरच समसमानता येईल. ज्या बाबी अयोग्य आहेत यावर विचार केला पाहिजे. जे चालत आले आहे त्यात सुधारणा काळानुसार केली पाहिजे. जनतेनी काही बाबतीत विचार केला पाहिजे. देशाचा विचार केला पाहिजे. देश चालविणाऱ्याकडे लक्ष दिले पाहिजे. केवळ मागणे सोडून दिली पाहिजे. आज पर्यंत सरकार देत आले आहे किती प्रमाणात आर्थिक सुधारणा झाली आहे याचे मुल्यमापन केले पाहिजे. ज्या योजनेतून काहीच भागत नाही अशा योजनेतून एक वर्ष मदत घेवू नका. काय परिणात होते हे पाहा. कारण जे मागायाला पाहिजे ते मागत नाही. सतत मागण्याची सवय लावली व ती लावुन घेतली आहे. महिलांना दिड हजारात काय भागते हेच महागाईच्या काळात कळून येत नाही. मेकअपचे सामान किंवा बऱ्यापैकी साडी सणावारांना घालण्यासाठी येते का! याचा विचार शांत डोक्यांनी करावा. उत्तर सापडेल. विचार करीत नाहीत. आज किमान सरकारी नोकरदारांना कमीत कमी पंचवीस ते तीस हजार रुपये मिळत असेल. तरी त्यांचे भागत नाही म्हणून तो भ्रष्टाचार करतो. चोऱ्या करतो. राशनचा माल कोठे जातो हे सर्वांना माहिती आहे. मुळात काही बाबी बंद करा. एक गोडावुन उघड त्यातुन महिण्याला घरातील कुटुंबसंख्यावरून चांगले दर्जेदार अन्नधान्य पुरवा. कशाला योजना राबविता किंवा कशाला याचे अनुदान, त्याचे अनुदान, विधवा, निराधार, वयोवृद्धांना योजनाद्वारे मिळणारी रक्कम मागू नका ती देवूही नका! महिण्याला खायला द्या, मोफत आरोग्य सुविधा, दर्जेदार समसमान शिक्षण मिळाले पाहिजे, ते सरकारने दिले पाहिजे. असे केले तर आरक्षणाचे मोर्च कशाला काढतील. जे पाहिजे ते मिळाले तर मागीतले जाणार नाही. आज प्रत्येजन सरकारला मागते. तेच मोफत दिलेतर लोकच गैरप्रकार करणार नाहीत, एका-एकाकडे एवढा चुकीच्या मार्गाने कमविलेला पैसा आहे की, तो सापडला तर अनेक दिवस मोजमाप करावे लागते. तरच अमाप संपत्तीची हाव कमी होणार आहे. आज कशालाही कर लावला जात आहे. पुर्वीपेक्षा अनेक कराची वसुली होत आहे. याचा विचार जनता बारकाईने करीत नाही. बँका, पोष्ट, एखादे सरकारी प्रमाणपत्र घ्यावयाचे झाले तर छुप्या मार्गाने जनतेकडून पैसा वसुल केला जातो.बँक प्रयेक बाबीला पैसे घेते. एसएमएस केला, व्यावहार केला दोन-चार रूपये वसुली होतात ऑनलाईन कापले जाते ते कळतही नाही, याबाबत विचार करा. प्रत्येकांनी विचार करून चालावे हीच अपेक्षा!

# कर्जमुक्तीची व्यापकता वाढली; दोन लाखांचे कर्ज सर्वांना माफ

**शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक जबाबदारी असल्याची भूमिका राज्य शासनाने सातत्याने घेतली आहे. त्याच भूमिकेचा अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक आविष्कार म्हणजे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'.**




या योजनेची नुकतीच घोषणा करण्यात आली. दरम्यानच्या काळात विविध लोकप्रतिनिधींनी या घोषणेचे स्वागत करताना काही नोंदी व सूचना केल्या होत्या. हजारो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या या योजनेतून कोणीही पात्र लाभार्थी अटी व शर्तींमुळे वंचित राहू नये, यासाठी लगेच या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर करून तिची व्याप्ती अधिक वाढविली आहे. त्यामुळे आता ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारी आणि न्याय्य स्वरूपाची योजना ठरली आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ही योजना राज्याच्या कृषी इतिहासातील महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून नोंदवली जात आहे. आता नवीन केलेल्या बदलांमुळे या संख्येत वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, शासनाने केवळ मोठी आर्थिक तरतूद केली नाही, तर सभागृहात जाहीर केलेल्या सुधारणांमुळे योजनेतील काही अटी शिथिल करून अनेक शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीचे दरवाजे अधिक व्यापकपणे खुले केले आहेत.

या सुधारणांमधील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांच्या लाभाची मर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी अशा शेतकऱ्यांना नव्या योजनेत मर्यादित लाभ मिळत होता. आता मात्र ही अट हटविण्यात आल्यामुळे अशा सर्व पात्र शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असमानता दूर झाली असून शासनाने समान न्यायाची भूमिका अधिक ठळकपणे मांडली आहे.

तितकाच महत्त्वाचा दुसरा निर्णय म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. अनेक शेतकरी या अटीमुळे संभ्रमात होते. शासनाने हा संभ्रम दूर करत नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे योजनेचा लाभ अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक झाला आहे.

यापूर्वीच्या घोषणेनुसार, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागत होते. नव्या योजनेत हा महत्त्वाचा अडसरही दूर करण्यात आला आहे. आता दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

या योजनेची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे तिची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जात आहे. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कर्जापुरत्या मर्यादित नसतात. शेतीचा वाढता खर्च, वीज, सिंचन, हमीभाव, बाजारपेठ आणि नैसर्गिक संकटे या सर्वांचा त्यांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत असतो. याची जाणीव ठेवून राज्य शासन कृषी क्षेत्रावर दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. केवळ कृषी वीजबिलासाठीच सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी दहा हजार कोटी रुपयांहून अधिक चुकारे अदा करण्यात आले असून, सोयाबीन खरेदी, कांदा बाजारभाव स्थिरीकरण, ठिबक सिंचनासाठी प्रलंबित निधी आणि कृषी समृद्धी योजनेसाठी अतिरिक्त तरतूद यांसारख्या निर्णयांतूनही शासनाची शेतकरीहिताची भूमिका स्पष्ट दिसून येते.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही; तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणे, त्यांना पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने वळविणे आणि कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे.

विधिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की, या सुधारणांमुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी एकही पात्र शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित राहू नये, हीच शासनाची भूमिका आहे. ही भूमिका केवळ घोषणांपुरती मर्यादित नसून, त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याची शासनाची तयारीही यातून दिसून येते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ आकडेवारीच्या नजरेतून न पाहता त्यांच्या आयुष्याशी निगडित वास्तव समजून घेऊन निर्णय घेण्याची संवेदनशीलता या सुधारणांमधून दिसून येते. त्यामुळे ही योजना आता पूर्वीपेक्षा अधिक व्यापक, अधिक समावेशक आणि अधिक परिणामकारक ठरली आहे.

कर्जमाफीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खांद्यावरील आर्थिक ओझे हलके करण्याबरोबरच त्यांच्या भविष्यातील शेतीसाठी नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम ही योजना करणार आहे. त्यामुळे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबांसाठी नव्या आशेचा किरण ठरत असून, सभागृहात जाहीर झालेल्या नव्या सुधारणांमुळे तिची व्यापकता आणि परिणामकारकता आणखी वाढली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कर्जमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल पडल्याची भावना राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निश्चितच दृढ झाली आहे.

**प्रवीण टाके,**
उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर

# श्रम शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासाला नवी दिशा मिळणार – कामगार मंत्री ॲड. फुंडकर

**मुंबई/प्रतिनिधी:** नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ आणि नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था यांच्यात कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. राज्यातील श्रम शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि उद्योगाभिमुख मनुष्यबळ निर्मितीला या करारामुळे नवी गती मिळेल, असा विश्वास कामगार मंत्री ॲड.. फुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

या कराराच्या माध्यमातून श्रमविषयक शिक्षण अधिक व्यावहारिक आणि कौशल्याधारित करण्यासह अल्पकालीन प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राच्या बदलत्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसित करून विद्यार्थी, कर्मचारी, मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिक तसेच कामगार क्षेत्राशी संबंधित घटकांना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यास यामुळे मदत होईल, असा विश्वास कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापकांची देवाणघेवाण, अभ्यासक्रमांचे अद्ययावतीकरण, संयुक्त संशोधन, कार्यशाळा, परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम आणि विस्तार उपक्रम प्राधान्याने राबविण्यात यावेत. श्रम कल्याण, सामाजिक सुरक्षा, औद्योगिक संबंध, मानव संसाधन विकास आणि रोजगारक्षम कौशल्य निर्मिती या क्षेत्रांमध्ये संशोधनाला चालना देत उद्योग व शिक्षण यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट या करारातून साध्य होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

हा सामंजस्य करार तीन वर्षांसाठी लागू राहणार असून परस्पर संमतीने त्याचा कालावधी वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे राज्यातील श्रम क्षेत्रात संशोधन, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख शिक्षण आणि उद्योग-संलग्न प्रशिक्षणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी कामगार मंत्री ॲड.फुंडकर यांनी व्यक्त केला.

## सावधान! स्वयंपाकघरातील 'या' भांड्यांची तपासा एक्सपायरी डेट; वाढू शकतो गंभीर आजारांचा धोका!



स्वयंपाकघरात आपण अनेक पिढ्यांची भांडी गोळा करतो. 'भांडं अजून चांगलं आहे, तुटलेलं नाही, मग कशाला फेकायचं?' हा आपल्या घरातील महिलांचा स्वभाव असतो. परंतु, वैद्यकीय शास्त्र आणि आरोग्य तज्ज्ञांच्या मते, भांडी पूर्णपणे तुटेपर्यंत किंवा खराब होईपर्यंत वापरणे आरोग्यासाठी अतिशय घातक ठरू शकते. चला तर मग जाणून घेऊया, कोणत्या भांड्यांचा वापर कधी थांबवायला हवा.

**१. ॲल्युमिनियमची भांडी**

ॲल्युमिनियमची भांडी वजनाने हलकी आणि स्वस्त असल्याने अनेक घरांमध्ये कढई किंवा टोप म्हणून सर्रास वापरली जातात.

कधी बदलावीत?: जर ही भांडी खूप जुनी झाली असतील, घासून घासून आतून पातळ झाली असतील किंवा त्यांना बारीक छिद्रे/खड्डे पडू लागले असतील, तर ती लगेच बदला.

धोका: अशा जुन्या भांड्यांमध्ये जेव्हा लिंबू, टोमॅटो किंवा आमसूल यांसारखे आंबट पदार्थ शिजवले जातात, तेव्हा ल्युमिनियमचे कण अन्नात विरघळतात, जे शरीरासाठी संथ विषासारखे काम करतात.

**२. प्लास्टिकचे डबे आणि बाटल्या**

मसाले, उरलेले अन्न किंवा फ्रिजमध्ये पाणी ठेवण्यासाठी आपण प्लास्टिकचे डबे वापरतो.

कधी बदलावीत?: प्लास्टिकच्या डब्यांवर ओरखडे पडल्यास, त्यांचा रंग बदलल्यास किंवा धुवूनही त्यांना अन्नाचा उग्र वास येत असल्यास ते डबे त्वरित मोडीत काढा.

धोका: जुन्या आणि घासलेल्या प्लास्टिकमधून रासायनिक घटक अन्नात मिसळतात, ज्यामुळे पोटाचे विकार उद्भवू शकतात.

**३. तांबे आणि पितळाची भांडी:**

आजी किंवा सासूबाईंच्या काळातील तांब्या-पितळाची भांडी आपण खूप अभिमानाने वापरतो. ही भांडी अनेक वर्षे टिकतात, यात शंका नाही, पण त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे.

**कधी बदलावीत?:** पितळाच्या किंवा तांब्याच्या भांड्यांच्या आतील 'कलई' (ढळप लेरींळपस) जर घासून निघून गेली असेल किंवा आतून भांडे हिरवे किंवा काळे पडू लागले असेल, तर ते वापरणे बंद करा.

उपाय: ही भांडी फेकून न देता, त्यांना पुन्हा व्यवस्थित कलई करून घ्या आणि मगच वापरा. कलई नसलेल्या तांब्या-पितळात आंबट पदार्थ ठेवल्यास अन्नातून विषबाधा होऊ शकते.

**४. मेलामाइनच्या प्लेट्स आणि बाऊल्स**

आजकालच्या मॉडर्न किचनमध्ये मेलामाइनच्या डिझायनर प्लेट्स खूप लोकप्रिय आहेत.

कधी बदलावीत?: जर मेलामाइनच्या प्लेटला किंवा वाटीला बारीक तडा गेला असेल, कडा तुटली असेल किंवा चमच्यांचे खूप जास्त डाग पडले असतील, तर ती वापरू नका. तडे गेलेल्या भागातून रसायने गरम अन्नासोबत पोटात जाण्याचा धोका असतो.

**५. लाकडी चमचे आणि चॉपिंग बोर्ड):**

नॉन-स्टिक पॅन खराब होऊ नये म्हणून आपण लाकडी उलाथने किंवा भाज्या कापण्यासाठी लाकडी बोर्ड वापरतो.

कधी बदलावीत?: लाकूड सतत पाण्यात राहिल्याने त्यात ओलावा टिकून राहतो. जर चॉपिंग बोर्डवर सुरीचे खूप खोल काप पडले असतील किंवा लाकडी चमच्याला तडे गेले असतील, तर ते लगेच बदला.

**धोका:** लाकडाच्या या फटींमध्ये डाळ-भाताचे कण अडकतात आणि तिथे हानिकारक बॅक्टेरिया (जिवाणू) वेगाने वाढतात, जे नुसते विसळून स्वच्छ होत नाहीत.

आरोग्यासाठी गुरुकिल्ली आठवणी नक्कीच महत्त्वाच्या आहेत, पण आपल्या कुटुंबाचे आरोग्य त्याहूनही अधिक मौल्यवान आहे. त्यामुळे दर ६ महिन्यांनी किंवा वर्षभराने आपल्या स्वयंपाकघरातील भांड्यांची तपासणी करा. जी भांडी निकामी झाली आहेत किंवा आरोग्याला घातक आहेत, त्यांना आठवणीचा कप्पा म्हणून शोकेसमध्ये ठेवा, पण रोजच्या स्वयंपाकात वापरणे टाळा!

## आजीच्या स्वयंपाकघरातले जाडे मीठ करु शकतं तुमचा स्ट्रेस कमी

आपल्या स्वयंपाकघरात जाडं मीठ सहज उपलब्ध असते. बहुतांश जण त्याचा वापर लोणचं, पापड किंवा काही पारंपरिक पदार्थांसाठी करतात. मात्र जाडं मीठ केवळ चव वाढवण्यासाठीच नव्हे, तर काही घरगुती उपयोगांसाठीही फायदेशीर मानले जाते. अर्थात, जाडं मीठ असो किंवा बारीक मीठ, त्याचे सेवन नेहमी मर्यादित प्रमाणातच करणे आवश्यक आहे. जास्त मीठ खाल्ल्याने रक्तदाब वाढणे, हृदयविकार आणि मूत्रपिंडांवर ताण येण्याचा धोका वाढू शकतो. जाडं मीठ कोमट पाण्यात घालून गुळण्या केल्यास घशातील खवखव, किरकोळ वेदना आणि तोंडातील स्वच्छता राखण्यास मदत होऊ शकते. हा उपाय तात्पुरता आराम देऊ शकतो, मात्र त्रास कायम राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. घरगुती उपाय करताना नेहमी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करावेत.

कोमट पाण्यात जाडं मीठ घालून पाय काही वेळ बुडवून ठेवल्यास दिवसभराच्या थकव्यानंतर आराम मिळतो. हा उपाय स्नायूंना आराम देण्यास मदत करतो. मात्र तो कोणत्याही वैद्यकीय उपचाराचा पर्याय नाही. झोपेचा त्रास असेल तर जाडं मीठ नक्कीच मदत करु शकतं. गरम पाण्यात मीठ घालायचे आणि त्यात पाय बुडवायचे. मिठाच्या पाण्याने अंघोळ किंवा शरीर शेकण्यासाठी जाडं मीठ वापरतात. यामुळे शरीराला आराम मिळतो आणि त्वचेवरील घाम व धूळ स्वच्छ होण्यास मदत होते. मात्र त्वचेवर जखम, संसर्ग किंवा गंभीर त्वचारोग असल्यास असा उपाय करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. स्वयंपाकात जाडं मीठ वापरताना त्याचे प्रमाण लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. काही पारंपरिक पदार्थ, लोणची किंवा फोडणीचे पदार्थ करताना जाडं मीठ हळूहळू विरघळत असल्याने चव संतुलित राहण्यास मदत होते. त्यामुळे एखादा पदार्थ वाफवताना त्याच्या पाण्यात हे जाडं मीठ घालावं. थेट पदार्थात घालू नये. अनेकांना वाटते की जाडं मीठ हे साध्या मिठापेक्षा अधिक आरोग्यदायी असते. प्रत्यक्षात, जाडं मीठ आणि बारीक मीठ यामधील सोडियमचे प्रमाण फारसे वेगळे नसते. गुणधर्म वेगळे असतात मात्र फार जास्त नाही. त्यामुळे कोणतेही मीठ वापरले तरी प्रमाणावर नियंत्रण ठेवणे सर्वात महत्त्वाचे आहे.

## तुम्हीही बेडवर बसून ऑफिसचे काम करता का?

आरामदायक अंथरूण चांगल्या झोपेसाठी उपयुक्त असते, पण ते तुमच्या ऑफिस डेस्क म्हणून काम करू शकत नाही. डॉ. निखिल जैन, कन्सल्टंट, स्पाइन सर्जरी, मणिपाल हॉस्पिटल द्वारका, नवी दिल्ली यांच्याकडून जाणून घ्या की, यामुळे कोणत्या समस्या उद्भवू शकतात आणि त्यावर उपाय काय आहेत
पलंगावर बसून काम करणे डेस्कवर काम करण्यापेक्षा अधिक आरामदायक वाटते. याच कारणामुळे अनेक लोक मऊ गादीवर बसून आणि उशीचा आधार घेऊन तासन्तास लॅपटॉपवर काम करत राहतात. मात्र, हा आराम पाठीच्या कण्यावर अतिरिक्त दबाव टाकू शकतो. याचा परिणाम लगेच जाणवत नाही, पण कालांतराने शरीरावर त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात.
सरळ बसल्यावर पाठीचा कणा शरीराचा समतोल राखतो. पण जेव्हा शरीर मऊ गादीत खोलवर जाते, तेव्हा योग्य मुद्रा राखण्यासाठी स्नायूंना जास्त मेहनत करावी लागते. यामुळे मान दुखणे, खांद्यांमध्ये ताठरपणा आणि कंबरदुखीची समस्या उद्भवू शकते.
जर पाठीच्या कण्याला सतत योग्य आधार मिळाला नाही, तर कालांतराने गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. हर्निएटेड डिस्क आणि क्रॉनिक नर्व्ह कॉम्प्रेशनमुळे वेदना पायांपर्यंत पसरू शकतात, ज्यामुळे चालणे-फिरणे आणि पायऱ्या चढणे देखील कठीण होऊ शकते. परिस्थिती गंभीर झाल्यास शरीराच्या काही भागांमध्ये अशक्तपणा किंवा बधिरता जाणवू शकते. सुरुवातीच्या टप्प्यात फिजिओथेरपी आणि जीवनशैलीतील बदलांमुळे आराम मिळू शकतो, परंतु गंभीर मज्जातंतू दाबल्यास (नर्व्ह कॉम्प्रेशन) अधिक उपचारांची आवश्यकता भासू शकते.
लॅपटॉपवर काम नेहमी खुर्ची-टेबलावर बसून करा. परंतु जर पलंगावर बसणे भाग असेल, तर या गोष्टी लक्षात ठेवा -
पाठीमागे आधार देण-ारी उशी ठेवा आणि वाकून बसणे टाळा. पाठीचा कणा त्याच्या नैसर्गिक स्थितीत ठेवा.
लॅपटॉप स्टँड किंवा पुस्तकांच्या मदतीने स्क्रीन डोळ्यांच्या पातळीवर ठेवा, जेणेकरून मान वाकवावी लागणार नाही.
जास्त वेळ सलग पलंगावर बसून काम करू नका. वेळोवेळी टेबल आणि खुर्चीचा वापर करा.
दर ३०-४० मिनिटांनी उठून थोडे फिरा, मान आणि खांदे फिरवा आणि हलके स्ट्रेचिंग करा.
पोटावर किंवा कुशीवर झोपून लॅपटॉपवर काम करणे टाळा.
योग, जलद चालणे आणि स्नायूंना मजबूत करणारे व्यायाम मुद्रा सुधारण्यास मदत करतात आणि पाठीच्या कण्यावरील दाब कमी करतात.
कामादरम्यान नियमित अंतराने विश्रांती घ्या. ही सवय पाठीच्या कण्याला आणि स्नायूंना दोघांनाही निरोगी ठेवण्यास मदत करते.



दीर्घकाळ चुकीच्या स्थितीत बसल्याने स्लिप डिस्क, सायटिका आणि स्पाइनल डिस्क झिजणे यांसारख्या समस्यांचा धोका वाढू शकतो.
हातांना मुंग्या येणे, बोटे सुन्न होणे किंवा वारंवार डोके दुखणे ही अशी चिन्हे असू शकतात की नसांवर आणि आसपासच्या ऊतींवर अतिरिक्त दाब पडत आहे.
डोके पुढे झुकवणे... लॅपटॉप किंवा मोबाईल स्क्रीन सतत पाहण्यासाठी डोके पुढे झुकवल्याने मान आणि पाठीच्या कण्यावर अतिरिक्त दाब येतो.
वाकून बसणे... खांदे आणि पाठ वाकवून बसल्याने पाठीच्या मधल्या भागावर (थोरेसिक) आणि कमरेवर दाब वाढतो. यामुळे कायमस्वरूपी पाठदुखी आणि स्नायूंचा असंतुलन होऊ शकते.
लंबर सपोर्टचा अभाव... मऊ गाद्या कमरेला पुरेसा आधार देऊ शकत नाहीत. यामुळे पाठीच्या कण्याची नैसर्गिक रचना प्रभावित होते आणि लंबर डिस्कवर अतिरिक्त दाब येतो.
दैनंदिन कामांवर परिणाम

# एआयचे युग; करिअरची चिंता आणि वास्तव

एआयच्या युगात करिअर सुरक्षित ठेवण्याची चिंता स्वाभाविक आहे. तज्ज्ञांनुसार, वैद्यकीय, कायदा, शिक्षण आणि बांधकाम यांसारख्या क्षेत्रांमध्ये जिथे मानवी निर्णय, संवेदनशीलता आणि कुशल कारागिरीची गरज आहे, तिथे नोकऱ्या सुरक्षित राहतील.
याव्यतिरिक्त, एआयबाबत एक वेगळा ट्रेंडही आहे. टॉप युनिव्हर्सिटीचे हुशार विद्यार्थी आता मोठ्या पगाराच्या नोकऱ्या सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यात अधिक रस घेत आ-हेत. प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या चार्ल्स म्यूलबर्गर या विद्यार्थ्याने मोठ्या कंपनीत इंटर्नशिप करण्याऐवजी स्वतःचा एआय स्टार्टअप सुरू केला आहे.
एआयमुळे डेटा आणि तंत्रज्ञानाशी संबंधित नोकऱ्यांमध्ये वाढ होईल, जिथे हातांच्या कौशल्याची गरज आहे तिथे नोकरी जाण्याचा धोका नाही
**वैद्यकीय –** उपचाराचे निर्णय घेणाऱ्या नोकऱ्या सुरक्षित फार्मासिस्ट हिरा मलिक यांच्या मते, आरोग्य क्षेत्रात कार्यालयाचे काम, औषधांच्या चिठ्ठ्या बनवणे आणि कॉल उचलणे यांसारखी कामे एआयमुळे प्रभावित होऊ शकतात, परंतु डॉक्टर आणि नर्सची गरज कायम राहील. डॉ. रियाज आगा यांच्या मते, प्लास्टिक सर्जरी सुरक्षित आहे.
**शिक्षण –** अभ्यास आणि बालसंगोपनात मानवी गरज शिक्षणात एआय शिक्षकांची जागा घेणार नाही. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या जनरेशनल सक्सेस लॅबचे संस्थापक शरथ जीवन म्हणतात की, विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विश्वासार्ह प्रौढ संबंधांची गरज नेहमीच राहील. बालसंगोपन तज्ज्ञ विगडॉर्ट्झ यांच्या मते, मुलांच्या काळजीसाठी लोकांना माणूसच हवा असतो.
**कारागिरी –** हाताने केले जाणारे काम नेहमी सुरक्षित राहील


फेडरेशन ऑफ मास्टर बिल्डर्सचे सीईओ ब्रायन बेरी म्हणतात की, बांधकाम क्षेत्रात एआयचा प्रभाव मर्यादित आहे. मिस्त्री, सुतार आणि प्लास्टर करणारे यांसारखे हाताचे कौशल्य नेहमी सुरक्षित राहतील. आपल्याला या क्षेत्राबद्दल विचार बदलावे लागतील कारण ही कामे एआयपेक्षा अधिक विश्वासार्ह आहेत.
**बँकिंग-फायनान्स –** नियमित नोकऱ्यांवर परिणाम, डेटा आणि एआयची भूमिका वाढेल
ब्लूमबर्ग इंटेलिजन्सचे वरिष्ठ बँकिंग विश्लेषक टोमाश नोएट्जेल यांच्या मते, बँकिंगमधील ग्राहकांच्या सामान्य सेवा आणि कार्यालयातील पुनरावृत्तीची कामे एआयच्या कक्षेत येतील. मात्र, डेटा आणि तंत्रज्ञानाशी संबंधित भूमिका वाढतील. जोखीम मूल्यांकन आणि निर्णय घेण्याची कामे सुरक्षित राहतील, कारण बँकांना यावरही मानवी देखरेखीची आवश्यकता आहे.

# पावसाळ्यात वाढणारा न्यूमोनियाचा धोका



पावसाळ्यात सर्दी-खोकला, खोकला आणि फुफ्फुसांशी संबंधित आजारांचा धोका वाढतो. यामुळे लहान मुले, वृद्ध आणि कमी प्रतिकारशक्ती अस-लेले लोक जास्त प्रभावित होतात. आर्द्रता, तापमानातील चढ-उतार, घरांमध्ये ओलसरपणा आणि हवेतील बुरशी-मोल्डसारखे अनेक घटक संसर्गाचा धोका वाढवतात.
२०२२ मध्ये भार-तात झालेल्या मल्टीसेंटर "SWORD' अभ्यासानुसार, मान्सूनमध्ये श्वसनमार्गाच्या संसर्गाची प्रकरणे सुमारे १३% पर्यंत वाढतात, तर उन्हाळ्यात हा आकडा फक्त ४% असतो.
'इंडियन जर्नल ऑफ चेस्ट डिसीज अँड अलाइड सायन्स'मध्ये २०१४ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, पावसात भिजून बराच वेळ ओले राहिल्याने न्यूमोनियाचा धोका वाढू शकतो.
त्यामुळे आज 'फिजिकल हेल्थ'मध्ये मान्सूनमधील न्यूमोनियाच्या धोक्याबद्दल बोलू. तसेच जाणून घेऊया की-
याची सुरुवातीची लक्षणे काय आहेत?
कोणत्या खबरदारीने हा धोका कमी करता येतो?
तज्ज्ञ- डॉ. संदीप कटियार, वरिष्ठ सल्लागार, पल्मोनोलॉजी, अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटल, कानपूर
प्रश्न- न्यूमोनिया काय आहे?
उत्तर- खाली दिलेल्या मुद्द्यांवरून समजून घ्या-
न्यूमोनिया हा फुफ्फुसांचा एक गंभीर संसर्ग आहे.
यात फुफ्फुसांना सूज येऊ शकते, पाणी किंवा पू भरू शकतो.
श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो.
शरीराला पुरेसा ऑक्सिजन पोहोचत नाही.
हे जीवाणू, विषाणू किंवा बुरशीमुळे होऊ शकते.
अनेकदा फ्लू, सर्दी-खोकला किंवा श्वस-नाशी संबंधित संसर्ग वेळेवर बरा न झाल्यास न्यूमोनियामध्ये बदलू शकतो.
प्रश्न- मान्सूनमध्ये न्यूमोनियाचा धोका वाढतो का?
उत्तर- होय, पावसामुळे आर्द्रता वाढते आणि त्यामुळे विषाणू व जीवाणू वेगाने वाढतात. याशिवाय, घरात ओलसरपणा आणि घाणीमुळे संसर्गाचा धोका वाढू शकतो.
प्रश्न- कोणत्या लोकांना न्यूमोनियाचा धोका जास्त असतो?
उत्तर- काही लोकांना सामान्य लोकांपेक्षा न्यूमोनियाचा धोका जास्त असतो
प्रश्न- न्यूमोनियाची सुरुवातीची लक्षणे काय असतात?
उत्तर- न्यूमोनिया झाल्यावर सुरुवातीला सामान्य सर्दी-खोकल्यासारखी लक्षणे दिसतात. त्यानंतर श्वासोच्छवासाशी संबंधित समस्या वाढू लागतात.
प्रश्न- पावसाळ्यात होणारी सामान्य सर्दी-खोकला आणि न्यूमोनिया यात फरक कसा ओळखायचा?
उत्तर- सामान्य सर्दीमध्ये हलका खोकला आणि ताप असतो, तर न्यूमोनियामध्ये तीव्र ताप, श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे आणि जास्त अशक्तपणा असतो. जर खोकला अनेक दिवस राहिला किंवा धाप लागली तर ही न्यूमोनियाची लक्षणे असू शकतात.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




मायग्रेनमध्ये मेंदूच्या नसा सक्रिय झाल्याने तीव्र डोकेदुखी होते, तर वेस्टिब्युलर मायग्रेन कानाच्या आतील वेस्टिब्युलर प्रणालीवर परिणाम करतो, जी शरीराचा समतोल आणि डोळ्यांच्या हालचाली सांभाळते. यामुळे व्हर्टिगो (तीव्र चक्कर), तीव्र प्रकाश, आवाज आणि वासासाठी संवेदनशीलता वाढते.
कोणाला जास्त धोका, बचाव कसा करावा?
चिंता, नैराश्य, डोक्याला दुखापत किंवा मायग्रेनचा इतिहास धोका वाढवतो. उपचार लक्षणांनुसार औषधे आणि सप्लिमेंट्सने केला जातो. चांगली झोप, कमी ताण व कॅफिन-अल्कोहोलपासून दूर राहणे यात उपयुक्त आहे.

## २ Joke — विनोद

सलमान : कॅटरीना सांग बरं भारतात चहा कुठं होतो?
कॅटरीना : सोपंच आहे, सगळ्या हॉटेलात.

## ३ Message — संदेश



Fiza mein mehakti saam ho tum,
Pyaar mein jhalakta jaam ho tum
Aur kaya kahe janam tere bare me
Kharche ka dusra naam ho tum.


## ४ Thought — सुविचार



शब्द जपून वापरावेत, शब्दांची धार तलवारीपेक्षा तीक्ष्ण आहे.

**संस्कृत सुभाषित**
**भद्रं कृतं कृतं मौनं**
**कोकिलैर्जलदागमे। दर्दुरा यत्र वक्तार :**
**तत्र मौन हि शोभनम्॥**
**अर्थ –** पावसाळा सुरु झाल्यावर कोकिळा मौन धारण करतात हे चांगले. कारण बेडकांचे बरळणे सुरु झाल्यावर (तिचे)मौनच शोभून दिसते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

### उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

### आडवे उत्तर

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजा-होम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

### उभे उत्तर

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ




## थोडक्यात/ संक्षिप्त

### विराटसोबत डिसकस केला वर्ल्ड कपचा प्लान', कोहलीबरोबरच्या मीटिंगनंतर कॅप्टन गिलने सगळंच सांगितले!

मुंबई: आयर्लंड आणि इंग्लंड यांच्याविरुद्धच्या टी-२० सीरिजमध्ये टीम इंडियावर पराभवाची नामुष्की ओढावली, त्यानंतर आता भारत आणि इंग्लंड यांच्यात ३ वनडे मॅचची सीरिज होणार आहे. मंगळवार १४ जुलैपासून वनडे सीरिजला सुरूवात होणार आहे, या सीरिजआधी भारताच्या वनडे टीमचा कर्णधार शुभमन गिल याने पत्रकार परिषद घेतली, या पत्रकार परिषदेत गिलने विराट कोहली आणि वनडे वर्ल्ड कपसाठीच्या टीम इंडियाच्या प्लानवर महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. मी विराट कोहलीसोबत २०२७ च्या वनडे वर्ल्ड कपच्या तयारीबद्दल बोलत आहे, असं गिल म्हणाला आहे.

रोहित-विराटबद्दल काय म्हणाला गिल?

'रोहित आणि विराट मागच्या एका दशकापासून टीम इंडियाच्या बॅटिंगचा कणा आहेत. दोघंही टीमचा महत्त्वाचा भाग राहणार आहेत. त्यांचा अनुभव आणि त्यांचं स्किल टीमसाठी अमूल्य आहे. मागच्या एका दशकात दोघांनीही वेगेवेगळ्या परिस्थितीमध्ये काय केलं आहे, हे आपण पाहिलं आहे', असं वक्तव्य गिलने केलं आहे.

'माझं आणि विराटचं परवाच बोलणं झालं, ज्यात आम्ही २०२७ वनडे वर्ल्ड कपच्या प्लानबद्दल चर्चा केली. आम्ही टीम कॉम्बिनेशन आणि कोणते खेळाडू टीमचा भाग असू शकतात. सध्या टीममध्ये नसलेल्या कोणत्या खेळाडूंचा विचार केला जाऊ शकतो. तसंच सध्याच्या टीम सेटअपमध्ये कोणता खेळाडू कोणत्या जागेवर बेस्ट असेल, यावर मी आणि विराटने चर्चा केली', असं शुभमन गिल म्हणाला आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी मागच्या वर्षी टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर दोघांच्याही वनडे क्रिकेटच्या भवितव्याबाबत वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. मागच्या वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यात विराट लागोपाठ दोन वनडे सामन्यांमध्ये डकवर आऊट झाला, पण त्यानंतर विराटने मागे पाहिलं नाही. न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे सीरिजमध्ये विराटने धमाका केला. हाच फॉर्म विराटने २०२६ च्या आयपीएलमध्येही कायम ठेवला. सिझनमध्ये ६०० पेक्षा जास्त रन करून विराटने आरसीबीला लागोपाठ दुसरी आयपीएल ट्रॉफी जिंकवून दिली. आयपीएल संपल्यानंतर मात्र विराट कोहली अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे सीरिजमध्ये दुखापतीमुळे खेळू शकला नाही. आता मात्र इंग्लंडविरुद्ध विराट मैदानात पुनरागमन करत आहे. गिलने विराटबद्दल केलेल्या या वक्तव्यामुळे तो वनडे वर्ल्ड कप खेळणार का नाही? या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. विराटने स्वत: आयपीएलवेळी आपल्याला वनडे वर्ल्ड कप खेळायचा आहे, हे स्पष्ट केलं होतं.

### यास्तिका-क्रांतीचे कौतुक, पण... 'लॉर्ड्स' जिंकल्यावर हरमनने विजयाचे क्रेडिट भलत्यालाच दिले!

इंग्लंडविरुद्धच्या लॉर्ड्स टेस्टमध्ये भारतीय महिला टीमचा २७० रननी दणदणीत विजय झाला आहे. भारताने दिलेल्या ४५६ रनच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा १८६ रनवर ऑलआऊट झाला. या विजयासोबतच टीम इंडियाने लॉर्ड्सवर इतिहास घडवला आहे. लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानात महिला टीमचा हा पहिलाच टेस्ट सामना होता. लॉर्ड्सच्या या पहिल्याच सामन्यात भारतीय महिला टीमने विजय मिळवला. क्रांती गौड आणि यास्तिका भाटिया भारतीय टीमच्या विजयाच्या शिल्पकार ठरल्या.

पहिल्या इनिंगमध्ये टीम इंडियाने स्मृती मंधानाच्या ८३ रन, हरमनप्रीत कौरच्या ५८ रन आणि दीप्ती शर्माच्या ५७ रनमुळे २८५ रन केल्या. यानंतर बॉलिंगला आलेल्या टीम इंडियाने इंग्लंडला १७० रनवर ऑलआऊट केलं, त्यामुळे टीम इंडियाला ११५ रनची आघाडी मिळाली. क्रांती गौडने सर्वाधिक ५ विकेट घेतल्या. याचसोबत लॉर्ड्सच्या ऑनर्स बोर्डवर नाव लागणारी क्रांती पहिली महिला क्रिकेटर ठरली. इंग्लंडला ऑलआऊट केल्यानंतर टीम इंडियाने ३४१/७ वर दुसरी इनिंग घोषित केली. यास्तिका भाटियाने ११३, स्मृती मंधानाने ७० आणि ऋचा घोषने ५० रनन केले, त्यामुळे इंग्लंडला अशक्य आव्हान मिळालं.

कॅप्टन हरमनने कुणाला दिलं क्रेडिट?

लॉर्ड्सवरच्या या ऐतिहासिक विजयानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरने क्रांती गौड आणि यास्तिका भाटियाचं कौतुक केलं, पण तिने विजयाचं श्रेय मात्र कोच अमोल मुझुमदारना दिलं. 'ओपनर आमची सगळ्यात मोठी ताकद आहेत. पहिल्या टप्प्यात त्यांनी केलेली बॅटिंग स्पेशल होती. ओपनर कायमच जबाबदारीने खेळतात, ज्यामुळे आमच्यावरचा दबाव कमी होतो. आम्ही कमी टेस्ट क्रिकेट खेळत असलो तरी आमचं रेकॉर्ड चांगलं आहे, याचं श्रेय आमच्या कोचिंग स्टाफला जातं. त्यांनी बरंच टेस्ट क्रिकेट खेळलं आहे, त्यामुळे टेस्ट क्रिकेट कसं चालवायचं हे त्यांना माहिती आहे', असं हरमनप्रीत म्हणाली.

'मला अमोल सरांना धन्यवाद द्यायचे आहेत, त्यांनी आणि पूर्ण कोचिंग स्टाफने आम्हाला या टेस्ट मॅचमध्ये पाठिंबा दिला. मागच्या दोन सीरिजमध्ये आमची कामगिरी निराशाजनक झाली, पण अमोल सरांनी आम्हाला एकत्र ठेवलं, त्यामुळे आम्ही जोरदार कमबॅक केलं. आम्ही घरी काही चांगल्या आठवणी घेऊन जात आहोत, त्याचा आनंद आहे', अशी प्रतिक्रिया हरमनप्रीतने दिली.

# धोनी चेन्नईचा मेंटर बनू शकतो:संजू सॅमसन कर्णधारपदाच्या शर्यतीत सर्वात पुढे

चेन्नइ: महेंद्रसिंग धोनी चेन्नई सुपर किंग्स चे मेंटर बनू शकतात. हेड कोच स्टीफन फ्लेमिंग यांनी १८ वर्षांनंतर संघ सोडल्यानंतर, फ्रँचायझी मोठ्या बदलांच्या तयारीत आहे. सूत्रांनुसार, उडघ व्यवस्थापन धोनीला मेंटरची जबाबदारी सोपवण्याचा विचार करत आहे. मात्र, यावर अंतिम निर्णय त्यांच्या संमतीनंतरच घेतला जाईल.

जर धोनी खेळाडू म्हणून संघाशी जोडलेले राहू इच्छित असतील, तर फ्रँचायझी त्यांच्या निर्णयाचा आदर करेल. गेल्या हंगामात गुडघ्याच्या दुखापतीमुळे ते एकही सामना खेळू शकले नव्हते. यासोबतच, संघ नवीन कर्णधाराच्या शोधात आहे आणि संजू सॅमसन या शर्यतीत सर्वात पुढे मानले जात आहेत. गेल्या हंगामात ऋतुराज गायकवाडने चेन्नईचे कर्णधारपद भूषवले होते.

धोनी IPL मध्ये १०० सामने जिंकणारे एकमेव कर्णधार आहेत. त्यांनी खझङ मध्ये सर्वाधिक २२६ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर रोहित शर्मा आहे. त्यांनी १५८ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे.

धोनीने आपल्या कर्णधारपदाखाली उडघ ला २०२३



मध्ये शेवटचे विजेतेपद मिळवून दिले होते. त्याच अंतिम सामन्यात त्यांनी शेवटचे कर्णधारपदही भूषवले होते. धोनीने आपल्या कर्णधारपदाखाली संघाला १३३ सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला आहे, तर ९१ सामन्यांमध्ये संघाला पराभव पत्करावा लागला.

IPL मध्ये सर्वाधिक सामने खेळणाऱ्या खेळाडूंमध्ये महेंद्रसिंग धोनी पहिल्या स्थानावर आहे. त्याने आतापर्यंत २७८ सामने खेळले आहेत. धोनीने चेन्नई सुपर किंग्जला पाच वेळा विजेतेपद मिळवून दिले आहे. त्याने ३८.३० च्या सरासरीने ५४३९ धावा केल्या आहेत. या दरम्यान धोनीने २४ अर्धशतकेही झळकावली आहेत. त्याने यष्टीरक्षणात ४७ स्टंपिंग आणि १५८ झेलही घेतले आहेत.

**कर्णधारही बदलू शकतो**

सीएसके व्यवस्थापन संघ कर्णधारपदाच्या बदलावरही विचार करत आहे. सूत्रांनुसार, संजू सॅमसन या भूमिकेसाठी सर्वात मजबूत दावेदार मानले जात आहेत. संजूने यापूर्वीही राजस्थान रॉयल्सचे कर्णधारपद भूषवताना संघाला प्लेऑफपर्यंत पोहोचवले आहे.

CSK चे शेवटचे IPL विजेतेपद २०२३ मध्ये आले होते. त्यानंतर संघाची कामगिरी सातत्याने घसरत गेली. २०२४ मध्ये संघ पाचव्या स्थानावर राहिला, २०२५ मध्ये शेवटच्या स्थानावर घसरला, तर २०२६ च्या हंगामात आठव्या स्थानावर राहून प्लेऑफमध्येही स्थान मिळवू शकला नाही.

## वैभव सूर्यवंशीला आणखी खतरनाक खेळाडू बनविण्यासाठी युवी सज्ज





भारताचा १५ वर्षीय उदयोन्मुख खेळाडू वैभव सूर्यवंशी अलीकडेच विम्बल्डनचा आनंद घेताना दिसला. विम्बल्डनच्या अंतिम सामन्याच्या वेळी युवराज सिंग, अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांसारखे अनेक क्रिकेटपटू तिथे उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान वैभवची भेट त्याचे आदर्श असलेल्या युवराज सिंग यांच्याशी झाली आणि त्याने त्यांच्याशी संवाद साधला. युवराज यांनी त्याला मार्गदर्शक (मेंटर) बनण्याची तयारी दर्शवली; त्यांनी वैभवचे कौतुक केले आणि त्याच्यासोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

अभिषेक शर्मा हा टीम इंडियाच्या सर्वात आक्रमक फलंदाजांपैकी एक आहे. त्याला स्वत:सारखाच एक विध्वंसक फलंदाज घडवण्यात युवराज सिंग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. युवराज यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे त्यांनी अभिषेकसोबत वेळ घालवला, तसाच वेळ त्यांना वैभवसोबतही घालवायचा आहे. युवराज सिंग यांना भेटून वैभव सूर्यवंशीही खूप आनंदी झाला.

'जिओस्टार'वर बोलताना युवराज सिंग म्हणाले, ''मी नेहमीच स्वत:ला 'टर्मिनेटर' म्हणतो. आता अभिषेक शर्मा हा 'टर्मिनेटर ४' आहेतो माझ्यापेक्षा चार पटीने अधिक चांगला आहे. त्यानंतर येतो 'टर्मिनेटर ६', म्हणजेच वैभव सूर्यवंशी, जो आणखीनच सरस ठरला आहे. मी माझ्या काळात माझे काम केले, अभिषेकने ती परंपरा पुढे नेली आणि आता वैभव नवीन मापदंड प्रस्थापित करत आहे. हा त्याच प्रवासाचा तिसरा टप्पा आहे.'' टेनिसचे उदाहरण देत ते पुढे म्हणाले, ''खेळाची प्रगती होताना पाहणे खूप छान वाटते. जेव्हा मी सिनर आणि अल्काराझ यांना पाहतो, तेव्हा टेनिसमध्ये होत असलेले बदल मला जाणवतात. अभिषेक आणि वैभव यांच्यामध्येही मला तसाच बदल दिसून येतो. मी अभिषेकला प्रशिक्षण देण्यात बराच वेळ घालवला आहे आणि मला वैभवसोबतही वेळ घालवायला आवडेल; त्यांचे भविष्य खूप उज्ज्वल आहे. ते उत्कृष्ट खेळाडू बनण्याच्या मार्गावर आहेत आणि मला खात्री आहे की ते त्या पातळीपर्यंत नक्कीच पोहोचतील.''

## न्यूझीलंडने वेस्ट इंडिजला ५ गडी राखून हरवल: मालिका १-१ ने बरोबरीत

न्यूझीलंडने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव केला आहे. गयाना येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात, जेडेन लेनोक्सच्या पाच विकेट्सच्या जोरावर न्यूझीलंडने वेस्ट इंडिजला केवळ १३८ धावांत गुंडाळले.

वेस्ट इंडिज संघाने आपले शेवटचे १० गडी केवळ ७५ धावांत गमावले. १३९ धावांच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाने ५ गडी गमावून सहज विजय मिळवला. या विजयासह न्यूझीलंडने ३ सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे.

**जेडेन लेनोक्स न्यूझीलंडचा तिसरा सर्वात यशस्वी एकदिवसीय फिरकीपटू ठरला**

न्यूझीलंडचा डावखुरा फिरकीपटू जेडेन लेनोक्स या सामन्याचा सर्वात मोठा नायक ठरला. त्याने केवळ १९ धावांत ५ बळी घेतले. ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. यापूर्वी खेळलेल्या ६ एकदिवसीय सामन्यांमध्ये लेनोक्सला कधीही २ पेक्षा जास्त बळी घेता आले नव्हते. त्याचे



पहिले चार बळी क्लीन बोल्ड स्वरूपात आले.

या शानदार कामगिरीसह, लेनोक्स न्यूझीलंडच्या पुरुषांच्या एकदिवसीय इतिहासातील तिसरा सर्वोत्तम आकडेवारी नोंदवणारा फिरकीपटू बनला आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर ईश सोढी (६/३९) आणि दुसऱ्या क्रमांकावर डॅनियल व्हिटोरी (५/७) यांची नावे आहेत.

**६३ धावांच्या सलामीच्या भागीदारीनंतर वेस्ट इंडिजची घसरगुंडी**

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजची सुरुवात अत्यंत शानदार झाली होती. सलामीवीर जॉन कॅम्पबेल आणि अकीम ऑगस्टे यांनी पहिल्या विकेटसाठी ६३ धावांची मजबूत भागीदारी केली. पॉवरप्लेच्या शेवटी दोघांनी वेगाने धावा केल्या, पण त्यानंतर न्यूझीलंडच्या फिरकीपटूंनी सामन्याचे चित्र बदलले.

मायकेल ब्रेसवेलने पहिले यश मिळवून दिले, त्यानंतर वेस्ट इंडिजने सलग विकेट गमावल्या. संघ १३८ धावांवर सर्वबाद झाला. जॉन कॅम्पबेलने सर्वाधिक ४३ धावा केल्या. अमीर जांगूने २० धावांची खेळी केली, तर इतर कोणताही फलंदाज २० धावांपर्यंत पोहोचू शकला नाही.

## बुमराह ९६८ दिवसांनी ODI खेळणार, रोहित-विराटचे पुनरागमन

जसप्रीत बुमराह ९६८ दिवसांनंतर वनडे क्रिकेटमध्ये पुनरागमन करेल. त्याने २०२३ च्या वर्ल्ड कप फायनलनंतर कोणताही वनडे खेळलेला नाही. इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना मंगळवारी बर्मिंगहॅममधील एजबेस्टन स्टेडियमवर खेळला जाईल. सामना दुपारी ३:३० वाजता सुरू होईल. या सामन्यात रोहित शर्मा आणि विराट कोहली देखील वनडे संघात परततील.

वनडेमध्ये भारताचे पारडे इंग्लंडवर वरचढ राहिले आहे. संघाने इंग्लंडविरुद्धचे आपले मागील ५ वनडे सामने जिंकले आहेत. एकूण दोन्ही संघांमध्ये ११० सामने खेळले गेले आहेत. भारताने ६१ जिंकले आहेत आणि ४४ हरले आहेत. २ सामने बरोबरीत सुटले आणि ३ सामने अनिर्णित राहिले.

ही मालिका भारतासाठी यासाठीही महत्त्वाची आहे कारण २०२७ च्या वनडे वर्ल्ड कपला आता सुमारे १५ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. भारताने नुकतीच इंग्लंडविरुद्धची टी-२० मालिका ४-० ने गमावली होती. यापूर्वी संघ आयर्लंडकडूनही मालिका हरला आहे.

## भारताच्या लेकींनी लॉर्डसवर इतिहास रचला, इंग्लंडच्या महिला संघावर २७० धावांनी दणदणीत विजय

मुंबई: हरमनप्रीत कौरच्या भारतीय महिला संघान लॉर्ड्सवर इंग्लडच्या महिला संघावर विजय मिळवत नवा इतिहास घडवला. जागतिक क्रिकेटची पंढरी अशी ओळख लाभलेल्या लॉर्ड्स वरती खेळवण्यात आलेल्या महिलांचा पहिला कसोटी सामना भारताने जिंकलाय. या कसोटी सामन्यामध्ये भारतीय महिलांनी इंग्लंडचा २७० धावांनी धुव्वा उडवला नाही. या कसोटीमध्ये भारताने इंग्लंडला विजयासाठी ४५७ धावांचं डोंगरा एवढा आव्हान दिलं होतं पण यजमान इंग्लंडला ते आव्हान पेलवलं नाही. चौथ्या आणि अखेरच्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव १८६ धावांमध्ये आटोपला आहे. भारतीय महिलांच्या नावावरती वनडे विश्व चषक विजयानंतर आता लॉर्ड्सवर ऐतिहासिक कसोटी विजयाची नोंद झाली आहे.

लॉर्डसवर १४२ वर्षात पहिली महिला कसोटी

लॉर्डसच्या १४२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा महिला कसोटी सामना खेळवण्यात आला होता. या सामन्यात भारतानं इंग्लंडला २७० धावांनी पराभूत केलं आहे. भारतानं चौथ्या डावात इंग्लंड समोर विजयासाठी ४५७ धावचं आव्हान ठेवलं होतं. भारताला पहिल्या डावात ११५ धावांची आघाडी मिळाली होती. त्यानंतर दुसऱ्या डावात भारतानं ३४१ धावांवर डाव घोषित केला होता. इंग्लंडचा तिसऱ्या दिवशीच पराभव निश्चित झाला होता. कारण इंग्लंडनं ५९ धावांवर ५ विकेट गमावल्या होत्या. मात्र एमी जोन्स आणि सोफी एक्लेस्टोन यांच्या अर्धशतकामुळं इंग्लंडच्या विजयाचा आशा कायम होत्या. मात्र, संघ १८६ धावांपर्यंत पोहोचू शकला.




क्रांती गौड, यास्तिका भाटियाची दमदार कामगिरी

भारताचा पहिला डाव २८५ धावांवर आटोपला होता. भारताच्या क्रांती गौडनं इंग्लंडच्या पहिल्या डावात ५ विकेट घेतल्या. त्यामुळं इंग्लंडचा संघ १७० धावांवर बाद झाला. पहिल्या डावातील आघाडीचा भारताला फायदा झाला. क्रांती गौडनं दोन्ही मॅचमध्ये मिळून ७ विकेट घेतल्या, तर स्नेह राणानं ६ विकेट घेतल्या. भारताच्या दुसऱ्या डावात यास्तिका भाटियानं ११३ धावांची खेळी केली.

इंग्लंडच्या पहिल्या डावामध्ये पाच विकेट्स घेणारी क्रांती गौड आणि भारताच्या दुसऱ्या डावात शतक झळकावणारी यास्तिका भाटिया यांची नावही लॉर्डच्या ऐतिहासिक फलकावरती आता कायमची कोरली गेली आहेत.लॉर्डसला क्रिकेटची पंढरी तिथं कित्येक वर्षानंतर पहिल्यांदा भारत आणि इंग्लंड महिला संघांमधील कसोटी सामना पार पडला. या चार दिवसांच्या कसोटी सामन्यात भारतान विजय मिळवणं हा खरोखर एक मोठा इतिहास आहे. भारतीय महिला संघानं लॉर्डसवर कसोटी सामन्यात विजय मिळवणं भारताच्या क्रिकेट इतिहासातील सुवर्णक्षण आहे.

दरम्यान, लॉर्डसवर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात १८८४ मध्ये पहिला कसोटी सामना खेळवण्यात आला होता. त्यानंतर तब्बल १४२ वर्षांनी पहिला महिला कसोटी सामना खेळवण्यात आला. ज्यात भारतीय महिलांनी विजय मिळवत इतिहास रचला.

# इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेचा टी२० पराभवाशी संबंध नाही

## २०२७ वर्ल्डकपसाठी गिलची रणनीती स्पष्ट

भारतीय क्रिकेट संघ इंग्लंड दौऱ्यावर असून, उद्या १४ जुलैपासून दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची वनडे मालिका सुरू होत आहे. टी२० मालिकेत इंग्लंडकडून ०-४ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर, आता भारतीय संघ वनडे मालिकेत कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय वनडे संघाचा कर्णधार शुभमन गिलने पत्रकार परिषदेत मालिकेचे महत्त्व आणि २०२७ च्या वर्ल्ड कपसाठीच्या योजनांवर सविस्तर भाष्य केले आहे.

'टी२० पराभवाचा वनडेवर परिणाम नाही'

टी२० मालिकेतील खराब निकालाचा वनडे मालिकेवर काही परिणाम होईल का, या प्रश्नावर गिलने स्पष्ट शब्दांत उत्तर दिले. तो म्हणाला, ''मला वाटत नाही की त्याचा फार काही परिणाम होईल. हा क्रिकेटचा एक वेगळा प्रकार आहे, संघ वेगळा आहे आणि उद्दिष्टेही वेगळी आहेत. या फॉरमॅटमधील वातावरण आणि खेळाडूंच्या भावना टी२० पेक्षा पूर्णपणे भिन्न आहेत.''

**२०२७ वर्ल्ड कपवर गिल आणि कोहलीचे लक्ष**

ही मालिका २०२७ च्या वर्ल्ड कपच्या तयारीसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे गिलने नमूद केले. तो म्हणाला की, वर्ल्ड कपसाठी तयारीची आमची रणनीती पूर्णपणे वेगळी आहे. संघात कोणत्या प्रकारचे संतुलन असावे, भविष्यात कोणत्या खेळाडूंची मदत होऊ शकते,



याबाबत आपण विराट कोहलीशी सविस्तर चर्चा केल्याचे गिलने सांगितले. गिल पुढे म्हणाला, ''आम्ही संघात कोणत्या गोलंदाजांना, अष्टपैलू खेळाडूंना आणि फिरकीपटूंना संधी देता येईल, यावर विचार करत आहोत. दक्षिण आफ्रिकेतील (२०२७ वर्ल्ड कपचे यजमान) खेळपट्ट्या जशा असतील, तशीच परिस्थिती येथे मिळणार आहे, त्यामुळे या मालिकेचा सराव आमच्यासाठी खूप मोलाचा आहे. आमची प्लेइंग इलेव्हन स्थिर असली, तरी नवीन खेळाडूंनाही संधी देणे आवश्यक आहे. त्यांना दबावाखाली खेळण्याचा अनुभव मिळाल्यास वर्ल्ड कपपूर्वी संघ अधिक बळकट होईल.''

**विराट आणि रोहित संघाचा कणा**

हर्षित राणा आणि नितीश कुमार रेड्डी यांच्या दुखापतीमुळे योजनांमध्ये काही प्रमाणात अडथळा आल्याचे गिलने मान्य केले. मात्र, तरीही संघाच्या कामगिरीबद्दल तो सकारात्मक दिसला. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्याबद्दल बोलताना गिलने म्हटले की, ''गेल्या दशकापासून विराट आणि रोहित भारतीय फलंदाजीचा कणा राहिले आहेत. ते आमच्या संघाचा अविभाज्य भाग असून, त्यांचा अनुभव आणि कौशल्य टीम इंडियासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.''

**मालिकेचे वेळापत्रक**

**पहिला सामना: १४ जुलै, बर्मिंगहॅम**

**दुसरा सामना: १६ जुलै, कार्डिफ**

**तिसरा सामना: १९ जुलै, लॉर्ड्स**

विराट कोहलीच्या दुखापतीनंतरच्या पुनरागमनामुळे आणि २०२७ च्या वर्ल्ड कपच्या दृष्टीने नव्या खेळाडूंना मिळणाऱ्या संधींमुळे या वनडे मालिकेकडे सर्वांचेच विशेष लक्ष असणार आहे.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार ५०० विशेष बसेस सोडणार -परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक

## ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार




**धाराशिव/पंढरपूर प्रतिनिधी:** आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर,पंढरपूरच्या नगराध्यक्षा श्रीमती.प्रणिता भालके व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले,राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत.७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास,तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी.तसेच पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता,निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा अशा सूचनाही परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी दिल्या.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती.यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत.तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा,भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.या स्थानकांवर पिण्याचे पाणी,सुलभ शौचालय,संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष,मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली भीमा बसस्थानची पाहणी**

आषाढी यात्रा शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून,आषाढी यात्रा सोहळ्यासाठी वारकरी- भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे.यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख वारकरी भाविक पंढरपुरात येतात.आषाढी यात्रेसाठी एस.टी ने येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.या अनुषंगाने प्रवासी भाविकांच्या सुविधेसाठी महामंडाळामार्फत पंढरपूर व पंढरपूर परिसरात चार तात्पुरते बसस्थानक निर्माण करण्यात येतात.या अनुषंगाने आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी श्री.विठ्ठल कारखाना, देगाव येथे तात्पुरते भीमा बसस्थानकाची पाहणी केली.

यावेळी वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या भीमा बसस्थाकावर,सुलभ शौचालय,शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,स्वच्छता,आरोग्य सुविधा, संगणकीय आरक्षण केंद्र,चौकशी कक्ष,मार्गदर्शन फलक,सीसीटीव्ही यंत्रणा तसेच सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक आदी बाबतची माहिती घेतली व संबधितांना आवश्यक सुचना त्यांनी यावेळी दिल्या.

## डी. एम. ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावीचे स्वागत, पालक मेळावा व गुणवंतांचा गौरव



**लातूर/प्रतिनिधी:** नवीन जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील अवंती नगर येथील डी. एम. ज्युनिअर कॉलेज, लातूर येथे अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत शासनाच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेद्वारे दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत, पालक मेळावा तसेच गएए व चक्ढ-उएढ परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.
कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा. कालिदासजी माने यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, पालक प्रतिनिधी ढोक, पोटे, श्रीमती शिंदे यांच्यासह पालक, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी गएए परीक्षेत ९९.८२ पर्सेंटाइल मिळवून आयआयटी दिल्ली येथे निवड झालेल्या घुले अद्वैत अरुण तसेच ९९.४२ पर्सेंटाइल मिळवून आयआयटी हैदराबाद येथे निवड झालेल्या बावा चाणक्य राहुल यांचा विशेष सत्कार करण्यात आला.
तसेच MHT-CET (PCB) मध्ये चव्हाण मेघराज (९८.९०%) व जमादार प्रणाली (७९.२२%), तसेच MHT-CET (PCM) मध्ये घुले अद्वैत (९९.८०%), बावा चाणक्य (९८.८०%), भोगावकर चिन्मय (९८.६४%), पोटे जान्हवी (९५.००%), जवंडरे अनोज (९३.८८%), शर्मा सारा (९३.३६%), कुलकर्णी ऋतुराज (९२.५६%), स्वामी स्वप्नील (९१.८९%), शेख सायमा (८७.४४%), गाडे वैष्णवी (८६.२१%), शिंदे समर्थ (८५.५२%), टेकाळे गौरहरी (८५.४७%), बोरकर ज्ञानेश्वर (८५.२१%), शिंदे प्रणव (८२.६२%), अग्रोया राज (८१.८५%), दिवटे पूनम (८१.६१%) आणि राठोड जगदीश (८०.७९%) या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.
प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस. चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. वैशाली भोसले तर आभार इयत्ता १२ वी कला शाखेतील खपरले पार्वती यांनी मानले.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. ए. डी. सूर्यवंशी, व्ही. एस. थोरात, एस. व्ही. कांबळे, बी. एस. बुरशे, व्ही. ए. भोसले, बी. के. माळी, एस. बी. बोधणे, एस. ए. शेख, एस. बी. माने, पी. सी. बामणकर, ए. ए. लखादिवे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी डी. के. पवार, डी. जे. जाधव, दिग्विजय पांचाळ, आर. पी. सुडे आणि ए. एस. हेडे यांनी परिश्रम घेतले.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टर पुरवठा योजनेसाठी १७ ऑगस्ट पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, (जिमाका):** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरून निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

लातूर जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र बचत गटांकडून सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र बचत गटांनी आपले अर्ज पूर्ण भरून येत्या १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन लातूर समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी ही सेवाभावी संस्था असून जगभरातील २२० पेक्षा अधिक देशात ४६०० क्लबच्या माध्यमातून १.२ मिलियन रोटरीन आपली सेवा व समर्पण देत असतात .लातूर येथील ४२ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावून चा ४३ वा पदग्रहण सोहळा रोटरी डिस्ट्रीक्टचे प्रांतपाल इलेक्ट क्षितीज झावरे व उपप्रांतपाल नागनाथ आगवाणे यांचे उपस्थितीत पार पडला. चालू वर्षाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले तर सचिव म्हणून उद्योजक उमेश पत्रावळे यांनी मावळते अध्यक्ष अमोल दाडगे व सचिव पवन मालपानी यांचेकडून पदभार स्वीकारला .

यावेळी मिडटावून चे सहयोगि क्लब रोटरी क्लब ऑफ सॅटॅलाइट अध्यक्ष सुप्रिया दाडगे व स्वाती बादाडे तसेच रोटरॅक्ट क्लब ऑफ मिडटावून च्या अध्यक्ष तनिक्षा बोरा सचिव यश बांगर व शौनक सांगवीकर यांनी पदभार स्वीकारला. तसेच इंटरॅक्ट क्लबचे ही पदग्रहण संपन्न झाले.

रोटरी क्लबच्या वतीने शहरात गेली सात वर्षांपासून निराधार ५० ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळा मोफत घरपोच डबा पुरवला जातो. तसेच कॅन्सर डिटेक्शन व मोफत नेत्र तपासणी व ऑपरेशन साठी अद्ययावत व्हॅनची सुविधा सुविधा करण्यात आली आहे .या व्हॅन ग्रामीण भागातील गरजूंची तपासणी करतात व सुविधा पुरवतात. तसेच ब्लड डोनेशन, शेतकऱ्यांसाठी शेती अवजारे बँक, शाळेतील मुलांना वॉटर कुलर, आरोग्य तपासणी, वृक्ष लागवड, सेंद्रिय शेती ,गट शेती बाबतही मदत केली जाते. अशा सेवेसाठी रोटरी ची समाजात खूप चांगली प्रतिमा असून राजकारण व जातपात विरहित व्यवसायिक, डॉक्टर्स, प्राध्यापक मंडळी एकत्र येऊन यात कार्य करीत असतात .

भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या पदग्रहण सोहळ्यात रोटरीचे माजी प्रांतपाल विजय भाऊ राठी मागील वर्षाचे प्रांतपाल सुधीर लातूरे, डॉक्टर सोपानराव जटाळ, अड.उदय गवारे, माधवराव पाटील टाकळीकर, शरद झरे, कवी नरसिंग इंगळे ,वेगवेगळ्या क्लब ची अध्यक्ष, सचिव, समाजातील मान्यवर व रोटरियन कुटुंबीयसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे टीम लीडर शिरीष उटगे तसेच शशिकांत मोरलावार ,लितेश शहा ,अजय दुडले ,अनिल पाटील ,विशाल आयाचित ,वीरेंद्र पुंडीपल्ले, प्रशांत भाटगावे ,जयप्रकाश सोनी ,मोतीलाल वर्मा श्रद्धानंद अपशेट्टी, रवींद्र बनकर, किशोर दाताळ, गिरीश पेन्सलवार , संगीता लातूरे व अनेक सदस्याने खूप मेहनत घेऊन हा कार्यक्रम संपन्न केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर राजगोपाल तापडिया व ओमप्रकाश झुरळे यांनी केले.

## प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा शिक्षण उपसंचालकानी केला सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिक्षण उपसंचालक दीपक चवने यांनी प्राचार्य केंद्रे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून प्राचार्य डी. एन. केंद्रे हे मागील ३५ वर्षांपासून गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात. या संकुलात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी जिल्हाधिकारी, वकील, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक अशा विविध पदांवर कार्यरत आहेत. शैक्षणिक 'लातूर पॅटर्न'च्या यशात प्राचार्य केंद्रे यांचाही वाटा आहे. प्राचार्य केंद्रे यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त शिक्षण उपसंचालक दीपक चवने यांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी ज्युक्टा संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंद बोकारे, वडजे यांच्यासह त्यांचे सहकारी उपस्थित होते.


# खेळाडुंचा शैलेशजी लाहोटी यांच्या जन्मदिनानिमित्त केला सन्मान



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर: श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शैलेशजी लाहोटी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, 'अजिवरद प्रतिष्ठान' या सामाजिक संस्थेच्या वतीने तायक्वांदो या ऑलिम्पिक क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवलेल्या खेळाडूंचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात 'रिलिजन टू रिस्पॉन्सिबिलिटी' या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष राहुल पाटील चाकूरकर आणि कॅप्टन बी. के. भालेराव यांच्या हस्ते दि १२ जुलै रोजी वंदे मातरम् सभागृह श्री केशवराज विद्यालय श्याम नगर लातूर येथे खेळाडूंना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला अजिवरद प्रतिष्ठान चे संस्थापक प्रवीण शिवणगिकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आशियाई तायक्वांदो प्रशिक्षक तथा राष्ट्रीय पंच मास्टर नेताजी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अजिवरद प्रतिष्ठान मागील अनेक वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम राबवत आहे. या प्रकारच्या सन्मानामुळे खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळते. लातूरकरांना लाहोटी परिवाराचे मोठे सामाजिक योगदान लाभले असून, शैलेशजी लाहोटी हे स्वतः सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतात. अजिवरद प्रतिष्ठान अशा प्रकारे कृतज्ञता व्यक्त करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

या कार्यक्रमास व्यासपीठावर संतोष बेंबळकर व महेश वळसंगे, हे उपस्थित होते. आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनील मुनाळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विवेक डोंगरे, आशिद बनसोडे, अमृत पावले, अनिल कांबळे, ज्ञानेश्वर यादव, मंगेश रंकाळे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार येवनगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा खोटा आरोप

## ग्राहक प्रतिनिधीसह यूट्यूब चॅनेल विरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** महावितरणच्या स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा खोटा आरोप करून आणि सोशल मीडियाद्वारे त्याचा हेतुपुरस्सर प्रसार करीत नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करणारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक संघटनेचे व यूट्यूब न्यूज चॅनेलचे संपादकांच्याविरुद्ध सावंतवाडी (जि. सिंधुदूर्ग) पोलीस ठाण्यात रविवारी (दि. १२) फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महावितरणकडून गंभीर दखल घेण्यात आली. स्मार्ट मीटरबाबत कपोलकल्पित तसेच नागरिकांमध्ये भीती व दहशत निर्माण होईल असे जाहीर व रेकॉर्डेड वक्तव्य केल्याप्रकरणी आणि केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी ही खोटी माहिती सर्व सोशल मीडियाच्या खात्यांवरून प्रसारित केल्याप्रकरणी यूट्यूबचे संपादकाच्याविरुद्ध जनतेत भीती निर्माण करून गुन्ह्यास चिथावणी देणे, गुन्हेगारी पद्धतीने धमकावणे, शांततेचा भंग करण्यासाठी जाणीवपूर्वक अपमान करणे, बदनामी करणेबाबत सावंतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार कलम ३५३ (१) (बी), ३५१ (३), ३५२ व ३५६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी सावंतवाडी पोलीस पुढील तपास करीत आहे.

स्मार्ट मीटर हे पूर्णपणे सुरक्षित आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. त्यात कोणताही 'कॅमेरा' किंवा गोपनीयतेचा भंग करणारी यंत्रणा नाही. वीजग्राहकांनी स्मार्ट मीटरबाबत पूर्णतः निश्चिंत राहावे. कोणत्याही कपोलकल्पित माहिती व खोटारड्या आरोपांना बळी पडू नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरबाबत अत्यंत खोटी व काल्पनिक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्यात येत असल्याचे देखील महावितरणतर्फे स्पष्ट करण्यात आले.

याबाबत माहिती अशी की, सावंतवाडी (जि. सिंधुदूर्ग) येथे स्मार्ट मीटर संदर्भात चर्चासत्र ठेवण्यात आले. त्यांचे रेकॉर्डिंग शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महावितरणकडून उपकार्यकारी अभियंता योगेंद्र वाघ, ग्राहक संघटना तसेच दीपक सहभागी झाले होते. यामध्ये महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत विविध फायद्यांची माहिती देण्यात आली तसेच विविध आरोपांचे सर्मपक खुलासे करण्यात आले.

तथापि, या चर्चासत्रामध्ये स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा धादांत खोटा आरोप केला. स्मार्ट मीटरमुळे नागरिकांच्या खाजगी आयुष्यावर पाळत ठेवली जात असल्याचा अत्यंत हास्यास्पद दावा त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केला. याबाबत महावितरणचे श्री. वाघ यांनी त्याचवेळी स्पष्टीकरण दिले. तरीसुद्धा यूट्यूब न्यूज चॅनेलने त्यांच्या इतर सोशल मीडियाच्या खात्यांवरून स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याची खोटी जाहिरात केली आणि या चर्चासत्रातील संदर्भ वगळून दिशाभूल करणारा २ ते ३ मिनिटांचा भाग 'स्मार्ट मीटरची चिरफाड' या मथळ्याखाली रिलच्या माध्यमातून हेतुपुरस्सरपणे प्रसारित केला. त्यात महावितरणकडून करण्यात आलेला खुलासा देखील वगळण्यात आला. असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## महाडीबीटी पोर्टलवर 'तूर मिनीकिट'साठी अर्ज प्रक्रिया सुरु; लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/(जिमाका) :** केंद्र व राज्य शासनाच्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना प्रमाणित तूर मिनीकीटचे (बियाणे संच) वाटप करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यासाठी प्राप्त एकूण ७ हजार मिनीकीटच्या भौतिक लक्षांकापैकी आजतागायत ३ हजार ८३५ मिनीकीटचे वितरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. उर्वरित ३ हजार १६५ तूर मिनीकीटसाठी अद्याप पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे वितरण प्रलंबित राहिले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी तातडीने ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत बियाणे संच वितरण करण्याची ही प्रक्रिया पूर्णपणे महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे, लाभार्थ्यांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे आणि यासाठी १० एप्रिल २०२६ पासूनच महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा खुली करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अर्ज करणे सोपे जावे, यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक टप्पे जाहीर केले असून, इच्छुकांनी सर्वप्रथम mahadbt.maharashtra.gov.in/Farmer या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन लॉगिन करावे, त्यानंतर 'अर्ज सादर करणे' या पर्यायावर क्लिक करून मुख्य घटकांमधील 'बियाणे वितरण, प्रात्याक्षिक, फ्लेक्झी घटक, औषधे आणि खते' हा पर्याय निवडावा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या उप-घटकांमधून 'बियाणे संच - तूर मिनीकीट' हा पर्याय निवडून आपला अर्ज सादर करावा, जेणेकरून शिल्लक राहिलेल्या बियाणेसंचाचा लाभ घेऊन शेतकऱ्यांना आपले उत्पादन वाढवता येईल.

# अभाविप लातूर जिल्हा अभ्यासवर्ग संपन्न

## नवीन जिल्हा समितीची घोषणा



**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, लातूर जिल्ह्याचा दोन दिवसीय अभ्यासवर्ग ११ व १२ जुलै दरम्यान औसा येथील श्री मुक्तेश्वर मंदिर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या अभ्यासवर्गात संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांचे वैचारिक प्रबोधन आणि आगामी शैक्षणिक वर्षातील कार्ययोजना अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

अभ्यासवर्गात उद्घाटन सत्र, कार्यपद्धती, महाविद्यालयीन काम, कार्यकर्ता व्यवहार, भाषण सत्र (वंदे मातरम् १५० वर्ष), प्रवास व संपर्क, सदस्यता तसेच व्यावहारिक प्रशिक्षण अशा विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्ता व्यवहार या विषयावर अभाविप देवगिरी प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश मुंढे यांनी मार्गदर्शन केले, तर भाषण सत्रात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. संदिपान जगदाळे यांनी वंदे मातरमला १५० वर्ष पूर्ण झाले. त्यामुळे वंदे मातरमचा इतिहास सांगत कार्यकर्त्यांना राष्ट्रहित, विद्यार्थी नेतृत्व आणि संघटन विस्तारासाठी प्रेरित केले.

अभ्यासवर्गादरम्यान औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी अभाविपच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करत आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी वर्ष २०२६-२७ साठी अभाविप लातूर जिल्ह्याची नवीन जिल्हा समिती घोषित करण्यात आली. प्रा. डॉ. प्रसाद कदम यांची जिल्हा प्रमुख, भागवत बिरादार यांची जिल्हा संयोजक, बालाजी हत्ते व शिवाजी जडे यांची जिल्हा सहसंयोजक, निशिगंधा बेंबळे यांची जिल्हा विद्यार्थिनी प्रमुख, ऋषिकेश अट्टल यांची जिल्हा कार्यालय मंत्री, तर ज्ञानेश्वर बिराजदार यांची जिल्हा कोष प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. तसेच प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, यश आरीकर, महेश भवर, ऋतुजा अट्टल आणि तुषार जाधव यांची जिल्हा समिती सदस्य म्हणून घोषणा करण्यात आली.

अभ्यासवर्गाच्या समारोपप्रसंगी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थी हित, शैक्षणिक गुणवत्ता, राष्ट्रनिष्ठा आणि संघटन विस्तार या चार प्रमुख विषयांवर अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर बिराजदार यांनी केले.

# संपादक मोईज सितारी यांचा 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने सन्मानित..







**लातूर/प्रतिनिधी :** जनहिताच्या प्रश्नांवर निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि सातत्यपूर्ण वृत्तांकन करणारे साप्ताहिक जनता एक्स्प्रेसचे संपादक तथा पत्रकार मोईज जमिरोद्दीन सितारी यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने रविवारी (१२ जुलै) मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. आर्यारवी एंटरटेनमेंट यांच्यावतीने आयोजित 'पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजवसेवक पुरस्कार सोहळा-२०२६' या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉल दादर येथे झालेल्या या सोहळ्यात आयोजक, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या हस्ते मोईज सितारी यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी श्रीधर कीर, विसुभाऊ बापट, अरुण म्हात्रे, पंढरीनाथ तामोरे, गुरुनाथ तिरपनकर, सुनील शिर्के, वैभव कदम, कृष्णा काजरोळकर, ॲड. गौरव पाटील आणि अतुल तोडकरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पत्रकारितेत निर्भीड, निष्पक्ष आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी वृत्तांकन केल्याबद्दल मोईज सितारी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. डिजिटल माध्यमाच्या प्रभावी वापरातून सामाजिक, प्रशासकीय आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत त्यांनी विश्वासार्ह पत्रकार म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. साप्ताहिक जनता एक्सप्रेस या आणि युट्यूब चॅनेलच्या माध्यमातून ते विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने वृत्तांकन करत असून, त्यांच्या बातम्यांची दखल प्रशासनासह समाजातील विविध स्तरांवर घेतली जाते. यापूर्वीही त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत विविध प्रतिष्ठित संस्थांकडून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा सन्मान लाभला असून, लातूर पत्रकारितेच्या शिरपेचातही मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल पत्रकार, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पार्टी ..

पार्टी लहान मोठी
भरुन घेतात कोष
लुटू लागले लुटारु
दुज्यांना देती दोष
विविध प्रकारमार्ग
दाबूनठेव आक्रोश
भुरळघाले आकडे
गल्लाभरु मदहोश
गोळा करा खंडणी
भले होई असंतोष
बिदागी दे व्यापारी
अवैध धंद्या संतोष
निर्मळ आम्हीफक्त
करतरहा कंठशोष
इलेक्ट्रोल बाँडस् ने
आणला नवा जोश
नाव आहे तुमचेही
तरीबसेना खामोश
फक्त करा बोंभाटा
सगळ्यां मिळे गोश
कर्जे बुडवून कुणी
उदो उदो उच्चैर्घोष
अस्वस्थ होई दिशा
घटिका येता प्रदोष
सत्ता स्थान मिळेतो
मनाउधळे असंतोष
निदानखुर्ची लाभता
जनसामान्या संतोष

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

## एस.आय.आर. अभियानात प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग महत्त्वाचा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि. १२ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एस.आय. आर.) अभियानाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक प्रवीण कस्तुरे व पुनीत पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण अभियानात कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी नियोजनबद्ध जनजागृती करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीत एस.आय.आर. अभियानाची उद्दिष्टे, मतदार नोंदणीची प्रक्रिया, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नवमतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रे तसेच बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक बीएलओ व बूथ प्रमुखाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराशी संपर्क साधून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाबाबत जागृत करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी एस.आय.आर. अभियानाच्या व्यापक जनजागृतीसाठी सज्ज करण्यात आलेल्या जनजागरण रथाचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष मा. अजित पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा रथ प्रभागातील सर्व भागांमध्ये फिरून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देणार आहे. या माध्यमातून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून मतदार यादी अधिक अचूक व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यावेळी नगरसेवक प्रवीण कस्तुरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लोकशाहीची खरी ताकद मतदारामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एस.आय.आर. अभियान हे केवळ प्रशासकीय काम नसून लोकशाही अधिक सक्षम करण्याचे अभियान आहे. प्रत्येक बीएलओ, बूथ प्रमुख आणि कार्यकर्त्याने नागरिकांपर्यंत जाऊन त्यांना या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

नगरसेवक पुनीत पाटील यांनीही प्रभागातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून एस.आय. आर. अभियान शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन केले. प्रत्येक बूथवर प्रभावी जनसंपर्क, घरभेटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## भंडारा सोहळ्यात किरकोळ कारणावरून वाद; आडत बाजार बंद

**लातूर/प्रतिनिधी :** येथील बाजार समिती परिसरात शुक्रवारी झालेल्या भंडारा सोहळ्यात किरकोळ भांडणाच्या कारणावरून सोमवारी (दि. १३) अडत बाजार बंद ठेवण्यात आला. सोमवारी सकाळी सौदा निघण्याच्या वेळी हमालांनी विरोध केल्याने सौदे निघाले नाहीत. बाजारात शेतीमालाची किरकोळ आवक असल्याने त्याचा फारसा परिणाम झाला नसल्याचे आडत व्यापाऱ्यांनी सांगितले. येथील बाजार समितीत शुक्रवारी भंडारा उत्सव झाला. भंडाऱ्याची पंगत सुरू असतानाच किरकोळ कारणावरून दोन गटांमध्ये चकमक उडाली. याच कारणावरून सोमवारी लातूरचा आडत बाजार बंद ठेवण्यात आला. शनिवारी बाजार समितीला सूट्टी देण्यात आली होती. वाद निवळला असून, मंगळवारी बाजार पूर्ववत होण्याची शक्यता असल्याचे बाजार समितीकडून सांगण्यात आले. दरम्यान, सोमवारी बाजारात आलेल्या अनेक शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागला.

### उदगीर नगर परिषद कार्यालय, जि. लातूर

(पाणी पुरवठा विभाग)

जा.क्र.उनप.४/२/पा.पु./कावि/ २५४२/२०२६ दिनांक १३ / ७ /२०२६

**निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगरपरिषद उदगीर जि. लातूर हे उदगीर नगर परिषद पाणी पुरवठा विभागा अंतर्गत खालील विविध कामे करिता दरपत्रक मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय किंमत | अनामत रक्कम | सुरक्षा रक्कम | कोरी निविदा किंमत | कामाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उदगीर नगर परिषद पाणी पुरवठा विभाग बनशेळकी डॅम वरील ९० एच पी क्षमतेची जळालेली मोटार दुरुस्ती सह साहित्य पुरवठा करणे बाबत. | २,४०,०००/- (जि.एस.टी. सह) | २,४००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | १ महिने |
| २ | उदगीर नगर परिषद उदगीर शहर वितरण व्यवस्थेवरील व्हॉल गळती बंद करण्यासाठी नट बोल्ट व जेन्ट दोरी पुरवठा करणे बाबत. | ७५,०००/- (जि.एस.टी. सह) | ७,५००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | ३ महिने |
| ३ | उदगीर नगर परिषद हद्दीतील नगर परिषद मलकीच्या विंधंन विहीरीवर नविन मोटार बसविणे व साहित्य पुरवठा करणे बाबत. | २,६५,०००/- (जि.एस.टी. सह) | २६,५००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | १ महिने |
| ४ | उदगीर नगर परिषद हद्दीतील नगर परिषद मलकीच्य विविध प्रभागातील विंधंन विहीरीचे मोटार दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे बाबत. | ९४,०००/- (जि.एस.टी. सह) | ९,४००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | १ महिने |
| ५ | उदगीर नगर परिषद पाणी पुरवठा विभाग बनशेळकी डॅम वरील ९० एच पी मोटार दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे बाबत. | २,४०,०००/- (जि.एस.टी. सह) | २,४००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | १ महिने |
| ६ | उदगीर नगर परिषद पाणी पुरवठा विभाग भोपणी तलाव येथील ५० एच पी मोटार व पंप दुरुस्ती तसेच ATS स्टार्टर दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे बाबत. | ३,८०,०००/- (जि.एस.टी. सह) | ३,८००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | १ महिने |
| ७ | उदगीर नगर परिषद हद्दीतील नगर परिषद मलकीचे प्रभाग क्र. १ मधील किल्ला गल्ली व आई वठा येथील विंधंन विहीरीचे मोटार दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे बाबत. | ७५,०००/- (जि.एस.टी. सह) | ९,०००/- | करारनामा करताना २ टक्के देयकातून कपात ८ टक्के | ५००/- | ३ महिने |

१) उपरोक्त कामासाठी निविदा मागवण्यात येत आहे कोरीनविदा फॉर्म पाणीपुरवठा विभाग दिनांक १४/०७/२०२६ पासून दिनांक २९/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील.

२) केंद्र शासन व राज्य शासन यांनी लागू केलेले नियम कायदे अध्यादेश शासन निर्णय व त्यातील तरतुदी निविदा धारकावर बंधनकारक असतील.

३) कोणतीही निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद उदगीर यांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद उदगीर

## स्मिता पट्टणशेट्टी यांचे निधन



**नळेगाव/अजगर मजेकुरी :** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील स्मिता दिपक पट्टणशेटटी (वय- ६५ ) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने रविवारी (ता.१२) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्याच्यावर सोमवारी (ता.१३ ) दुपारी एक वाजता देवंग्रारोड येथील स्वतः च्या शेतात अंत्यविधी करण्यात आला.

यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन,नातवंडे असा परीवार आहे. नळेगाव येथील प्रसिद्ध डॉक्टर दिपक पट्टणशेटटी यांच्या त्या पत्नी होत.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६